# अमळनेर, एरंडोल आणि यावल तालुके, जळगाव जिल्हा, महाराष्ट्रातील 10 वाळूच्या ठिकाणांची जनसुनावणी.

<u>**सारांश**</u>

1. **परिचय :-**

   **अमळनेर, एरंडोल आणि यावल तालुका, जळगाव जिल्हा, महाराष्ट्रातील 10 वाळूच्या ठिकाणांसाठी पर्यावरणीय मंजुरी मागितली आहे.**

   - **मे. इंटिग्रेटेड प्रिसिजन सिस्टम्स अँड सर्व्हिसेस प्रा. लि. यांना जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे जळगावच्या वाळूच्या ठिकाणांसाठी पर्यावरणीय मंजुरी मिळवण्याचे काम देण्यात आले आहे.**
   - **डीजीएम नागपूरने खाण योजना मंजुरी पूर्ण केली आहे.**
   - **फॉर्म -1 एम, पीएफआर, ईएमपी, डीएसआर मधील अर्ज आणि वाळूच्या स्पॉट्ससाठी मंजूर खाण योजनांसह पर्यावरणीय मंजुरीसाठी सार्वजनिक सुनावणी प्रक्रियेसह सबमिट केले जाईल.**

2. **स्थळ नकाशा :-**



## अमळनेर, एरंडोल आणि यावल तालुके, जळगाव जिल्हा, महाराष्ट्रातील 10 वाळूच्या ठिकाणांची जनसुनावणी.

3. **स्थळ नकाशा :-**

| अ. क्र | गाव / वाळूचा घाट | तालुका | नदीचे नाव | लगतचा गॅट क्रमांक / सर्वेक्षण / खसरा क्रमांक. | लांबी X रुंदी X खोली (मीटर) | एकूण वाळू उपलब्धता | खाण व्याप्ती क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | उत्रान ए.एच | एरंडोल | गिरणा | 17 | 150*70*2.5 | 1.05 | 1391 |
| 2 | उत्रान ए.एच | एरंडोल | गिरणा | 9 | 370*70*2.5 | 2.59 | 3432 |
| 3 | हनुमानखेडेसिम भाग-१ | एरंडोल | गिरणा | 1 to 5, 13, 14 & 19 | 380*65*2.5 | 2.47 | 3273 |
| 4 | हनुमानखेडेसिम भाग-2 | एरंडोल | गिरणा | 91, 93, 95 to 100 | 375*65*2.5 | 2.44 | 3230 |
| 5 | पिंपरी | यावल | तापी | 1,2,3,6,7,8,9,10,12,13, 16,273,274 & 275 | 532*20*2.5 | 1.06 | 1410 |
| 6 | शिरागड | यावल | तापी | 2, 6, 128, 129 & 130 | 648*16*3 | 1.04 | 2748 |
| 7 | पाथराळे | यावल | तापी | 3 & 158 | 563*18*3 | 1.01 | 2686 |
| 8 | टाकरखेडा-१ | एरंडोल | गिरणा | 1, 2, 3 & 4 | 255*55*2.5 | 1.4 | 1859 |
| 9 | टाकरखेडा-2 | एरंडोल | गिरणा | 111, 117, 118 & 119 | 260*55*2.5 | 1.43 | 1895 |
| 10 | जालोद | अमळनेर | तापी | 3 & 4 | 250*40*3 | 1 | 2651 |

4. **उत्खननाची पध्दत :-**
   - **अ) उत्खननाची पध्दत - ड्रिलींग आणि ब्लास्टिंग पध्दतीचा वापर न करता वाळू घाटातून वाळूचे उत्खनन करण्यात येईल. फक्त कुदळ, पावडी, घमेले यासारख्या साधनांचा वापर करुन मजूरांव्दारे कोरडया नदी पात्रातून वाळूचे उत्खनन करण्यात येईल.**
   - **ब) यंत्रे / उपकरणे आवश्यक :- पावडी, घमेला, ट्रॉलीसह ट्रॅक्टर.**
   - **क) वाहतूक:- वाळूच्या जागेपासून डेपोसाठी निश्चित केलेल्या जागे पर्यत व ग्राहकांना ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे.**
   - **पुर्नभरण प्राप्तीकरण :- उघडे पडलेले क्षेत्र पावसाळ्यानंतर आपोआप पुन्हा भरले जाईल. नदीकाठ व वाहतुकीच्या रस्त्यालगत वृक्षारोपण केले जाईल.**

5. **<u>पर्यावरण व्यवस्थापन योजना</u>**

**अ) वायू प्रदूषण नियंत्रण उपाय यंत्रणा :-**

- **वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्या रोडवर वेळोवेळी पाणी शिंपडले जाईल.**
- **ट्रॅक्टर ट्रॉली व ट्रकवर ताडपत्री अच्छादूनच वाळूची वाहतूक टप्पा-टप्पाने केली जाते.**
- **वाहतुकीदरम्यान वाळूची गळती होणार नाही याची पुरेपुर काळजी घेण्यात येईल.**
- **नदीकाठी व वाळूच्या जागे जवळील मोकळ्या जागेवर वृक्षारोपण केले जाईल.**

**ब) ध्वनी नियंत्रण उपाय :-**

- **उत्खनन व वाळू वाहतूक केवळ दिवसा केली जाईल.**
- **अल्प प्रमाणात ध्वनीप्रदुषण अपेक्षित असेल.**
- **गाडयांचा आवाज कमी करण्यासाठी वाळू वाहतूक करणा-या वाहनांची नियमित देखभाल केली जाईल.**
- **वाळू वाहतूक वाहनांच्या गती नियंत्रीत केल्या जातील.**

**क) जल प्रदूषण नियंत्रण उपाय :-**

- **वाळू उत्खनन केवळ कोरड्या नदीच्या पात्रातूनच केले जाईल.**
- **उत्खनन केलेल्या खड्डाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीपेक्षा वर ठेवली जाईल.**
- **नदीचा प्रवाह कृत्रीमरित्या वळविला जाणार नाहीत.**
- **नदी पात्रात वाहने धुण्यास मनाई राहील.**
- **उत्खननातून कोणत्याही सांडपण्याचा प्रवाह तयार होणार नाही.**

- **कामगारांसाठी फिरते शौचालयांची व्यवस्था राहील.**
- **पावसाळ्यात आणि पूरात उत्खनन टाळण्यात येईल. जेणे करुन नविन वाळूचा थर जमा होण्यास मदत होईल.**

**ड) जमीन प्रदुषण नियंत्रण :-**

- **कोरड्या नदीच्या पात्रात वाळू उत्खननामुळे तात्पुरते खड्डे तयार होतील, जे पावसाळ्यात पुन्हा भरुन येतील**
- **नदीच्या रूंदीच्या तीन मीटर किंवा <u>रूंदीच्या 1/10 व्या जागेचे सुरक्षा अंतर नदीच्या काठापासून</u> (**"Sustainable sand mining guidelines"**) सोडले जाईल.**
- **पॉलिथीन पिशवी, जूट पिशवी इत्यादी कचरा नदीच्या पात्रात राहू/सांडण्याची परवानगी राहणार नाही.**
- **उत्खननास दिलेल्या परवानगी पेक्षा जास्त उत्खनन होणार नाही.**
- **नदीकाठी आणि जवळपास मोकळ्या जागेवर वृक्षारोपण केले जाईल.**

**6. <u>हरित पट्टा निर्माण योजना</u> :-**

| | |
|---|---|
| **हरित पट्टयाची जागा** | **लीजच्या सीमेच्या दोन्ही बाजूंच्या आणि नदीकाठच्या बाहेर कच्या रोडच्या कडेला** |
| **दोन रोपामधील अंतर** | **4 मीटर** |
| **प्रजातींची निवड** | **चांगल्या प्रजातींची शिफारस केली जाईल.** |

**वृक्षारोपणांसाठी चांगल्या प्रजातींची शिफारस :-**

| **वृक्षाच्या जातीचे नाव** | **स्थानिक नाव** | **महत्व** |
|---|---|---|
| **आझादिरक्ता इंडिका** | **कडुलिंब** | **तेल उत्पादन** |
| **टेक्टोना ग्रँडिस** | **टीक** | **एंटीबैक्टीरियल, अँटीफंगल** |
| **बांबूसा वल्गारिस** | **बांबू** | **एन्थेलमिंटिक अँटी-इंफ्लेमेटरी, अॅस्ट्रिंजंट प्रॉपर्टीज** |

**7. <u>व्यावसायिक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापन :-</u>**

- **खाण चालकांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील.**
- **कान, डोळा आणि हाताचे संरक्षणाची साधने या व्यतिरिक्त सुरक्षा हेल्मेट आणि पादत्राणे दिली जातील.**
- **कामगारांना डस्ट मास्क दिले जातील.**
- **खाण कामगारांसाठी पिण्याच्या पाण्यासाठीची सोय करुन देण्यात येईल.**
- **खाण साइटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल.**

**8. निष्कर्ष :-**

## अमळनेर, एरंडोल आणि यावल तालुके, जळगाव जिल्हा, महाराष्ट्रातील 10 वाळूच्या ठिकाणांची जनसुनावणी.

- अमळनेर, एरंडोल आणि यावल तालुका, जळगाव जिल्हा,महाराष्ट्रातील 10 वाळूचे ठिकाण MoEFCC मार्गदर्शक तत्त्वांनुसार B2 श्रेणीत येतात.
- उत्खननाच्या कमी प्रमाणामुळे पर्यावरणावर परिणाम होण्याची शक्यता नाही आणि त्यामुळे हे गावाच्या फायद्याचे ठरेल.
- प्रस्तावित प्रकल्प स्थानिक रहिवाशांना अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी प्रदान करेल.
- प्रस्तावित प्रकल्प सामाजिक पायाभूत सुविधा आणि या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासास सकारात्मक योगदान देईल.
- हवा, पाणी, ध्वनी, माती, घनकचरा व्यवस्थापन इ. सारख्या सर्व पर्यावरणीय प्रश्नांवर MoEF&CC मार्गदर्शक सूचनांनुसार कार्य केले जाईल.